दैनिक
# चकमक
संपादक : शामसुंदर चितोडा | कार्यकारी संपादक : कैलास फुलारी
वर्ष : ०१ ले | अंक : १५ | जालना | शनिवार १५ ऑगस्ट २०२६ | पाने : ४ | किंमत : २ रूपये







# मराठवाड्यासह जिल्ह्यासाठी काहीही कमी पडू देणार नाही : मुख्यमंत्री फडणवीस

## भाजपचे नवीन जिल्हा कार्यालय जनसेवेचे केंद्र बनेल ; मराठवाडा दुष्काळमुक्त करण्यासाठी नदीजोड प्रकल्पाला गती देणार

जालना/प्रतिनिधी : भारतीय जनता पक्षाचे कार्यालय हे केवळ पक्षाचे कार्यालय नसून जनसेवा आणि विकासाचे केंद्र आहे. सर्वसामान्य नागरिकांची कामे या कार्यालयातून झाली पाहिजेत. जालना जिल्ह्यातील जनता भाजपवर प्रेम करणारी असून, आगामी काळात पक्षाला मोठे यश आणि जनतेचा आशीर्वाद मिळेल. जिल्ह्याच्या विकासाच्या वाटचालीत कोणतीही अडचण येऊ देणार नाही तसेच विकासकामांसाठी निधीची कमतरता भासू देणार नाही, अशी ग्वाही राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. जालना येथे भारतीय जनता पक्षाच्या नवीन जिल्हा कार्यालयाच्या भूमिपूजनप्रसंगी आयोजित सभेत मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. यावेळी त्यांनी केंद्र व राज्य शासनाच्या विविध विकासकामांचा आढावा घेत आगामी काळातील विकासाचे चित्र स्पष्ट केले. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशातील २५ कोटी नागरिकांना गरिबीच्या जाळ्यातून बाहेर काढण्यासाठी मोठ्या प्रमाणावर विकासनिधी उपलब्ध करून देण्यात आला. त्यामुळे देश आज वेगाने प्रगतीच्या दिशेने वाटचाल करीत आहे. महाराष्ट्रातही सामान्य माणसाच्या जीवनात परिवर्तन घडवून आणणारी अनेक कामे सुरू आहेत. मागील काळात काँग्रेसने शेतकऱ्यांना केवळ आश्वासने दिली. मात्र, आम्ही शेतकऱ्यांना नियमित वीजपुरवठा देण्यासाठी प्रयत्नशील आहोत. सध्या आठ तास वीज देत असून, लवकरच हा वीजपुरवठा बारा तासांपर्यंत करण्याचा आमचा प्रयत्न आहे, असेही फडणवीस यांनी सांगितले. मराठवाडा दुष्काळमुक्त करण्याचा निर्धार मराठवाड्याच्या पुढील पिढीवर दुष्काळाचे सावट राहू नये, यासाठी शासन प्रयत्नशील असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले. कोल्हापूरचे पाणी उजनी धरणात आणून ते नदीजोड प्रकल्पाच्या माध्यमातून गोदावरी खोऱ्यात उपलब्ध करून देण्याच्या व्यवस्थेवर लवकरच काम सुरू करण्यात येणार आहे. या माध्यमातून आगामी काळात मराठवाडा दुष्काळमुक्त करण्याच्या दिशेने मोठे पाऊल उचलले जाईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.





**भाजपचे कार्यालय कार्यकर्त्यांसाठी मंदिरासमान : रवींद्र चव्हाण**

भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण म्हणाले की, भाजपचे नवीन कार्यालय हे केवळ कार्यकर्त्यांसाठीचे कार्यालय नसून जनसेवेचे मंदिर असणार आहे. या कार्यालयातून जनतेच्या प्रश्नांना न्याय मिळवून देण्यासाठी कार्यकर्त्यांनी काम केले पाहिजे.

**मूळ कार्यकर्ता मजबूत असल्याने पक्ष मजबूत : पंकजा मुंडे**

पालकमंत्री पंकजा मुंडे यांनी भाजपच्या संघटनात्मक ताकदीचा उल्लेख करताना सांगितले की, भाजपचा मूळ कार्यकर्ता मजबूत असल्यामुळे पक्षाची ताकद वाढली आहे. तळागाळातील कार्यकर्त्यांच्या मेहनतीमुळे पक्षाला सातत्याने यश मिळत आहे.

**जुन्या कार्यकर्त्यांच्या त्यागामुळे पक्षाचे वैभव : रावसाहेब दानवे**

माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब दानवे म्हणाले की, भाजपच्या जुन्या पिढीतील कार्यकर्त्यांनी संघर्षातून पक्षाची पायाभरणी केली. त्या कार्यकर्त्यांनी रचलेल्या मजबूत पायावर आज भाजपचे वैभव उभे आहे. जुन्या कार्यकर्त्यांचे योगदान पक्ष कधीही विसरणार नाही. यावेळी माजी मंत्री तथा आमदार संजय कुटे, खासदार अजित गोपछडे, खासदार रामराव वडकुते, लक्ष्मणजी सावजी, आमदार अरुण लखानी, आमदार संतोष दानवे, माजी आमदार विलास खरात, राहुल भैया लोणीकर, मराठवाडा संयोजक नितीन काळे, मनोज पांगारकर, भाऊराव देशमुख, महापौर वंदना मगरे, उपमहापौर राजेश राऊत, महिला मोर्चा जिल्हाध्यक्ष संध्याताई देठे यांच्यासह भाजपचे जिल्हा व शहर पदाधिकारी, मंडळ अध्यक्ष, नगराध्यक्ष, नगरसेवक, विविध आघाड्यांचे पदाधिकारी, कार्यकर्ते, शेतकरी बांधव व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आमदार नारायण कुचे यांनी केले. सूत्रसंचालन भास्कर दानवे यांनी केले, तर आभार माजी आमदार कैलास गोरंट्याल यांनी मानले.

**फडणवीसांच्या नेतृत्वात शेतकरीहिताचे निर्णय : आ.लोणीकर**

आमदार बबनराव लोणीकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कार्याचा गौरव करताना सांगितले की, शेतकऱ्यांना दोन वेळा कर्जमाफी, वीजबिल माफी तसेच वॉटरग्रीडसारखे मोठे प्रकल्प राबविण्याचे काम फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली झाले आहे. जालना जिल्ह्याच्या विकासासाठीही त्यांच्या नेतृत्वातून मोठे पाठबळ मिळत आहे.

## माळशेंद्रा-गोंदेगाव-बावणे पांगरी इजिमा क्र. १९ ला दोन्ही महामार्गांशी जोडण्याची मागणी

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन; पाच-सहा गावांच्या दळणवळणाचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी निधी देण्याची मागणी

जालना : मौजे माळशेंद्रा-गोंदेगाव-बावणे पांगरी इजिमा क्र. १९ हा रस्ता जालना-देऊळगाव आणि जालना-भोकरदन या दोन्ही राज्यमहामार्गांना जोडण्यात यावा, तसेच माळशेंद्रा येथील नदीवर पूल उभारण्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. याबाबत माळशेंद्रा ग्रामपंचायतीच्या वतीने मुख्यमंत्री यांना निवेदन सादर करण्यात आले असून, निवेदनावर सरपंच विजय नामदेव लहाणे आणि उपसरपंच शिवाजी पाटील जाधव यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. माळशेंद्रा-गोंदेगाव-बावणे पांगरी इजिमा क्र. १९ हा परिसरातील नागरिकांच्या दळणवळणाच्या दृष्टीने महत्त्वाचा रस्ता आहे. मात्र सद्यस्थितीत हा रस्ता कोणत्याही प्रमुख महामार्गाशी जोडलेला नसल्यामुळे परिसरातील नागरिक तसेच विद्यार्थ्यांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. माळशेंद्रा, गोंदेगाव आणि बावणे पांगरी ही गावे जालना शहरालगत असून, या गावांमध्ये मोठ्या प्रमाणात लोकसंख्या आहे. शिक्षण, आरोग्य, रोजगार, बाजारपेठ तसेच विविध शासकीय कामांसाठी नागरिकांना जालना शहरात नियमितपणे ये-जा करावी लागते. त्यामुळे इजिमा क्र. १९ ला दोन्ही राज्यमहामार्गांशी जोडणी मिळाल्यास नागरिकांच्या दळणवळणाची समस्या मोठ्या प्रमाणात दूर होणार आहे. इजिमा क्र. १९ वरील माळशेंद्रा येथील नदीवर पूल उभारण्याची मागणीही निवेदनात करण्यात आली आहे. रस्त्याची महामार्गाशी जोडणी आणि नदीवरील पूल या दोन्ही कामांमुळे परिसरातील वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम होणार आहे. विशेषतः पावसाळ्यात नदीला पाणी आल्यास वाहतुकीवर परिणाम होण्याची शक्यता असते. त्यामुळे नागरिक, विद्यार्थी, शेतकरी तसेच अत्यावश्यक सेवांसाठी प्रवास करणाऱ्या नागरिकांच्या दृष्टीने नदीवरील पूल अत्यंत महत्त्वाचा असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.




**चार वर्षांपासून पाठपुरावा**

या रस्त्याच्या प्रश्नासाठी मागील चार वर्षांपासून सातत्याने पाठपुरावा करण्यात येत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. यापूर्वी महसूल (पान ३ वर)



जालना : जालना शहर महानगरपालिकेच्या आर्थिक परिस्थितीचा विचार करून शासनाकडून मिळणाऱ्या जीएसटी अनुदानात वाढ करण्यात यावी, या प्रमुख मागणीसाठी मुख्यमंत्री यांना निवेदन देण्यात आले. महानगरपालिकेच्या विविध विकासकामांना गती देण्यासाठी तसेच शहरातील मूलभूत सुविधांचा दर्जा उंचावण्यासाठी महापालिकेला अधिक आर्थिक पाठबळ मिळणे आवश्यक असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. यावेळी महापौर वंदना मगरे, उपमहापौर राजेश राऊत, सभापती अशोक पांगारकर, भास्कर आबा दानवे, कैलास गोरंट्याल यांच्यासह महानगरपालिकेतील पदाधिकारी व इतर मान्यवर उपस्थित होते.



उद्या ८० व्या १५ ऑगस्ट स्वतंत्र्य दिनाच्या पार्श्वभुमीवर जालना न्यायालय व जिल्हाधिकारी कार्यालयावर आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. तिरंग्याच्या रंगानी उजळलेली शासकीय इमारतींची ही रोषणाई जालनाच्या स्वातंत्र्य दिनाच्या उत्साहात भर घालत आहे. **छायाचित्र किरण खानापुरे**

## नवीन जालना भागातील रहिवाशांसाठी एसआरपीएफच्या आरक्षित जागेवर भव्य उद्यान व क्रीडांगण उभारण्याची नगरसेवक अश्विन भास्करराव अंबेकर यांची आमदार अर्जुनराव खोतकर व मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्याकडे मागणी

जालना/प्रतिनिधी : मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस जालना दौऱ्यावर आले असता नगरसेवक अश्विन भास्करराव अंबेकर यांनी भेट घेऊन जालना शहरातील नवीन जालना भागात असलेल्या एसआरपीएफच्या आरक्षित जागेवर भव्य उद्यान, नाट्यगृह व क्रीडांगण यांची उभारणी करण्याची मागणी निवेदनाद्वारे केली. तसेच स्थानीक आमदार अर्जुनराव खोतकर यांनाही निवेदन देऊन सदरील विकास कामांसाठी निधी मिळवून द्यावा अशी विनंती केली. मुख्यमंत्री फडणवीस यांना निवेदन देतांना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे,



युवा नेते अभिमन्यू खोतकर, शहरप्रमुख विष्णू पाचफुले, पालिकेतील विरोधी पक्षनेते कमलेश खरे, नगरसेवक दुर्गेश काठोठीवाले, संजय डुकरे, अमोल ठाकूर आदींची यावेळी उपस्थिती होती. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस व आमदार अर्जुनराव खोतकर यांना दिलेल्या निवेदनात नगरसेवक अश्विन अंबेकर यांनी म्हटले आहे की, जालना शहराची लोकसंख्या पाच लाखांहून अधिक झाली आहे. नगरपालिकेतून महानगरपालिकेत रुपांतर झालेल्या या शहरात एकच उद्यान आहे. भौगोलिकदृष्ट्या जालना शहर हे अर्धे नवीन जालना व अर्धे जुना जालना असे दोन भागात विभागलेले आहे. नवीन जालना भागात अडीच लाखांपेक्षा अधिक लोकसंख्या आहे (पान ३ वर)

# संपादकीय

## त्यातून यशाला गालबोट

विद्यार्थी आंदोलकांवर बिहारमध्ये एके-४७ मधून गोळीबार झाल्याने त्यात आणखी भर पडली. सावरलेली सरकारची प्रतिमा या प्रकरणात पुन्हा घसरण्याची, आंदोलकांच्या सरशीची शक्यता माध्यमांना दिसू लागली. तशा वृत्तांकनाला सुरूवात होत असतानाच संबंधित पोलिस अधिकाऱ्याच्या निलंबनाची घोषणा झाली. आंदोलन मागे घेताना 'आंदोलक विद्यार्थ्यांवर कोणतेही खटले दाखल होणार नाहीत' असं आश्वासन विद्यार्थी नेत्यांनी मिळवलं होतं. पण, घाईघाईने त्यालाही हरताळ फासला जातो आहे, अशा बातम्या दिल्लीसह विविध राज्यांतून येऊ लागल्याने सरकारच्या विश्वासार्हतेचा प्रश्न उपस्थित होऊ लागला होता. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी(Devendra Fadnavis) अत्यंत सावधपणे, राजकीय परिपक्वता दाखवत महाराष्ट्रापुरता हा विषय निकाली काढला. बिहार आणि आसाम सरकारांनीही मग तसा निर्णय घेतला. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशाचीही त्याला जोड मिळाली. आणखी एक दरड ढासळण्यापासून रोखली गेली! भारतात सरकारकडे एवढी प्रचंड शासनक्षमता आहे, की तिचा पूर्ण वापर करण्याची वेळ क्वचितच येते. इथलं सामाजिक, राजकीय वातावरणही विवेकी, परिपक्व आहे. लोकशाही शासन व्यवस्था इथे अंगवळणी पडली आहे. इस्लामी देशांसारखा सत्तेच्या पाशवी बळाचा वापर करावा लागत नाही. केंद्र सरकारला घटनादत्त अधिकारांचं मोठं वरदान आहेच; त्यात सरकार नुसतं स्थिर नाही, चांगलं भरभक्कम आहे. देश पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या प्रभावाखालीच आहे. अशा परिस्थितीत सत्तेचा 'शासन' म्हणून किंचितही अधिक वापर सरकारच्या प्रतिमेवर विपरीत परिणाम करणारा ठरू शकतो. प्रधान यांचं संसदेच्या आवारातलं स्वागत, बिहारमधला एके-४७ चा वापर किंवा दिल्लीतला 'पॅलेट गन'चा वापर- या तिन्ही घटनांची स्पष्टीकरणं द्यायची वेळ आता सरकारवर आली आहे. संयमाला लवकर सोडचिठ्ठी दिल्याचा हा परिणाम आहे. परिस्थिती हाताळताना पंतप्रधान मोदी कोणत्या नीतीचा अवलंब करताहेत हे जराही लक्षात न घेता झालेल्या या घटनांमुळे सरकारवर आरोपांच्या फैरी सुरू आहेत. फडणवीस यांच्यासारखी भूमिका सर्व पातळ्यांवर घेतली गेली असती, काही काळ जाऊ दिला असता, तर सरकारला आज विरोधकांवर उलट हल्ला करता आला असता. तसे असंख्य मुद्दे असूनही संसदेतली चर्चा वरील मुद्द्यांभोवतीच केंद्रीत झाली आहे. तेच मुद्दे देशभर जात आहेत. आंदोलन मिटवताना चार पावलं पुढे गेलेल्या सरकारला दोन पावलं मागे यावं लागतं आहे. विद्यार्थ्यांना पुन्हा चिथवण्यासाठी वेगवेगळे मुद्दे पुढे आणण्याचा प्रयत्न देशात अनेकांकडून होतो आहे. त्यांना या वातावरणातून ताकद मिळू शकते. राजकारणात मिळवलेल्या यशाचं 'पूर्ण यशा'त रूपांतर होईपर्यंत थांबणं केव्हांही श्रेयस्कर असतं. पुढची खेळी खेळण्याची संधी प्रत्येकालाच असते! भारतीय जनता पक्ष खरंतर ओळखला जातो त्याच्या मजबूत संघटनेमुळे. या पक्षाच्या परिवारात अनेक अनेक संस्था, संघटना आहेत आणि या प्रत्येकाची संघटनात्मक रचना, बांधणी, यंत्रणा मजबूत आहे. भाजपच्या या वैशिष्ट्यांची तुलना होऊ शकेल, असा दुसरा पक्ष देशात नाही. त्यामुळे, भाजपला आव्हान देणं कोणासाठीही अशक्य आहे, असं वाटत असतानाच देशाच्या मुख्य न्यायमूर्तींच्या तोंडून सहज निसटलेल्या एका उद्गारातून एक आंदोलन उभं राहतं आणि जे गेल्या बारा वर्षात घडलं नाही, अशी माघार सरकारला घ्यावी लागते, हे देशात सर्वांसाठीच विचार करण्यासारखं आहे. 'सरकारचा किंवा भाजपचा पराभव' यासारख्या उथळ आणि वरकरणी विश्लेषणाचा हा मुद्दा नाही. ज्या वयोगटातून हे आंदोलन उभं राहिलं, फैलावलं, त्यातून व्यवस्थेविषयी जी चीड निर्माण झाली, त्याचा धोरणकर्ते आणि समाजचिंतकांनी खोलात जाऊन विचार करण्याची गरज आहे. ही गरज ज्यांच्या लक्षात येईल, त्यांनाच येणाऱ्या काळाचा अंदाज घेता येईल. राष्ट्रीय लोकशाही आघाडीतल्या पक्षांच्या पदाधिकाऱ्यांनीही सरकारच्या प्रयत्नात अडथळे येईल, असं वागणं टाळलं, तर बरं. अन्यथा, आज नसलेली 'कॉक्रोच पार्टी' उद्या खरोखरच उभी राहील. भारतात सरकारकडे एवढी प्रचंड शासनक्षमता आहे, की तिचा पूर्ण वापर करण्याची वेळ क्वचितच येते. इथलं सामाजिक, राजकीय वातावरणही विवेकी, परिपक्व आहे. लोकशाही शासन व्यवस्था इथे अंगवळणी पडली आहे. इस्लामी देशांसारखा सत्तेच्या पाशवी बळाचा वापर करावा लागत नाही. केंद्र सरकारला घटनादत्त अधिकारांचं मोठं वरदान आहेच; त्यात सरकार नुसतं स्थिर नाही, चांगलं भरभक्कम आहे. देश पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या प्रभावाखालीच आहे. ज्यापक्षाची नोंदणी नाही, पदाधिकारी-कार्यकारिणी नाही, देशात कुठे कार्यालय नाही- असा पक्ष दिल्लीत 'जंतरमंतर'सारख्या ठिकाणी ३७ दिवस सलग आंदोलन करतो; कुठलाही परिचित चेहरा नेता म्हणून नसताना देशभरातून विद्यार्थ्यांचे लोंढेच्या लोंढे दिल्लीला धडकू लागतात, देशातल्या असंख्य शहरांमध्ये विद्यार्थी कोणत्याही प्रस्थापित राजकीय पक्षाच्या पाठिंबा किंवा पुढाकाराशिवाय रोज रस्त्यावर येऊ लागतात, तेव्हा त्या वातावरणाची दखल कोणत्याही, कितीही शक्तिशाली सरकारला घ्यावीच लागते. केंद्रातील राष्ट्रीय लोकशाही आघाडीचं सरकार जनमताविषयी विशेष संवेदनशील असल्याने त्यांना या असंतोषाचा अर्थ, त्यातली ताकद नेमकी समजली. त्यांनी आंदोलकांच्या तिन्ही मागण्या मान्य केल्या. आंदोलन संपलं. विद्यार्थी घरोघरी गेले. हातून निसटून चाललेल्या वातावरणावर केंद्र सरकारने शेवटच्या दोन दिवसांत चांगली पकड मिळवली. हे वातावरण आणखी काही काळ असंच ठेवण्यात सरकारचं हित होतं. आपली 'शासन' म्हणून असलेली ताकद कधी वापरायची आणि 'सत्ताधारी म्हणून न्याय करणारे आम्हीच आहोत' याची केवळ जाणीव देऊन बहुतांश प्रश्न कसे आपल्या सोयीने सोडवायचे, हे कोणत्याही सत्ताधाऱ्यांचं खरं कौशल्य असतं. लोकशाहीत 'सरकार' ही कधीच एक व्यक्ती नसते. सरकारच्या धोरण-नीतीत अनेकांचे आडाखे-विचार-मनसुबे दडलेले असतात. राजकीय प्रश्न हाताळताना यात जेवढी एकवाक्यता असेल, तेवढं त्या सरकारचं यश वाढत असतं. आंदोलन संपवण्यासाठी शेवटच्या दोन दिवसांत शिताफीने ज्या हालचाली झाल्या, त्यावरून या सरकारचं मुत्सद्दीपण अधोरेखित झालं होतं. पण, राजीनामा द्यावा लागलेल्या धर्मेंद्र प्रधान यांचं संसदेच्या आवारात दुसऱ्याच दिवशी जे स्वागत झालं, त्यातून या यशाला गालबोट लागायला सुरुवात झाली, असं दिसतं.

# भारतीय स्वतंत्र्य दिवस




भारतीय स्वातंत्र्य दिवस हा दरवर्षी १५ ऑगस्ट रोजी राष्ट्रीय सण म्हणून भारतात साजरा केला जातो. १५ ऑगस्ट १९४७ रोजी युनायटेड किंग्डमपासून देशाच्या स्वातंत्र्याची आठवण म्हणून या दिवसाचे महत्त्व आहे. याच दिवशी भारतीय स्वातंत्र्याचा कायदा १९४७ च्या तरतुद लागू होऊन भारतीय संविधान सभेला वैधानिक सार्वभौमत्व प्राप्त झाले होते. भारताचे प्रजासत्ताक देशात रूपांतर होईपर्यंत राज्याचे प्रमुख म्हणून किंग जॉर्ज सहावे हे कायम होते. २६ जानेवारी १९५० रोजी (भारतीय प्रजासत्ताक दिन म्हणून साजरा केला जातो) भारताने राज्यघटना स्वीकारली आणि देशाचा सार्वभौम कायदा असलेले भारतीय संविधान लागू करून हा देश प्रजासत्ताक बनला. मोठ्या प्रमाणावर अहिंसक आंदोलने आणि सविनय कायदेभंगासाठी प्रख्यात झालेल्या भारतीय स्वातंत्र्य चळवळीनंतर देशाला स्वातंत्र्य मिळाले होते. स्वातंत्र्यानंतर धार्मिक आधारावर भारताची फाळणी झाली, ज्यामध्ये ब्रिटिश भारत हा भारत आणि पाकिस्तानमध्ये विभागला गेला. फाळणीनंतर हिंसक दंगली झाल्या तसेच मोठ्या प्रमाणावर जीवितहानी झाली. धार्मिक हिंसाचारामुळे जवळपास १.५ कोटी लोकांनी स्थलांतर केले. १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताचे पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांनी राजधानी दिल्ली येथील लाल किल्ल्याच्या लाहोरी गेटवर भारतीय राष्ट्रध्वज फडकावला. त्यानंतरच्या प्रत्येक स्वातंत्र्यदिनी विद्यमान पंतप्रधान परंपरेने लाल किल्ल्यावर ध्वज फडकावतात आणि राष्ट्राला संबोधित करतात. हा संपूर्ण कार्यक्रम भारताचा राष्ट्रीय प्रसारक असलेल्या दूरदर्शनद्वारे प्रसारित केला जातो. हा कार्यक्रम शक्यतो उस्ताद बिस्मिल्ला खान यांच्या सनई संगीताने सुरू होतो. इ.स. १७७० पासून भारतावर इंग्रजांचे राज्य होते. १९व्या शतकापासूनच सर्व राज्यांना इंग्रजांनी आपल्या सैन्यबळावर ताब्यात ठेवले होते. १८५७ च्या स्वातंत्र्य समरानंतर ब्रिटिशांनी त्यांची व्यवस्था अजूनच शिस्तीची केली. १८८५ साली भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना झाली. दुसऱ्या महायुद्धानंतर ब्रिटिशांना लक्षात आले की, आपल्याला भारतावरचे राज्य व युद्ध हे सांभाळता येणार नाही आहे. तसेच दुसऱ्या बाजूला भारतीय क्रांतिकारकांचा जोर वाढत होता. ही गोष्ट कळल्यानंतर ब्रिटनच्या पंतप्रधानांनी जून १९४७ पर्यंत भारत पूर्णपणे स्वतंत्र करण्याची हमी दिली. अखेर दिनांक १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाला. पण त्यावेळी भारताचे पाकिस्तान आणि भारत असे दोन तुकडेही पडले.५ पाकिस्तानी भागात राहणाऱ्या अनेक पंजाब्यांना व सिंधीना त्यांचे घरदार, पैसा सोडून यावे लागले. अनेक लोक ह्यामध्ये मारलेही गेले. पुढे ह्या विभाजनामुळे काश्मीरचा प्रश्नही पुढे आला. स्वतंत्र भारत २६ जानेवारी १९५० रोजी प्रजासत्ताक झाला. भारताची राज्यघटना तयार करण्यात भारतरत्न, विश्वरत्न, बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर ह्यांचा मोलाचा वाटा होता. प्रजासत्ताक भारताचे पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरू व पहिले राष्ट्रपती राजेंद्र प्रसाद होते. रवींद्रनाथ टागोर ह्यांनी लिहिलेले जन गण मन हे भारताचे राष्ट्रगीत तर बंकिमचंद्र चट्टोपाध्याय ह्यांनी लिहिलेले वन्दे मातरम् हे राष्ट्रीय गीत म्हणून ठरवले गेले. स्वातंत्र्य दिन हा भारतातील तीन राष्ट्रीय सुट्ट्यांपैकी एक असतो. (इतर दोन म्हणजे २६ जानेवारी- प्रजासत्ताक दिन आणि २ ऑक्टोबर- महात्मा गांधींचा जन्मदिन.) हा दिवस सर्व भारतीय राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये साजरा केला जातो. स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येला, भारताचे राष्ट्रपती राष्ट्राला संबोधित करतात. १५ ऑगस्ट रोजी पंतप्रधान हे दिल्लीतील लाल किल्ल्याच्या ऐतिहासिक स्थळाच्या तटबंदीवर भारतीय ध्वज फडकावतात. आपल्या भाषणात पंतप्रधान गेल्या वर्षातील कामगिरीवर प्रकाश टाकतात, महत्त्वाचे मुद्दे मांडतात आणि पुढील विकासाचे आवाहन करतात. तसेच ते भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील नेत्यांना श्रद्धांजली वाहतात. जन गण मन हे भारतीय राष्ट्रगीत गायले जाते. भाषणानंतर भारतीय सशस्त्र दल आणि निमलष्करी दलाच्या तुकड्यांचा मार्च पास्ट होतो. परेड आणि स्पर्धांमध्ये स्वातंत्र्यलढ्यातील देखावे आणि भारताच्या विविध सांस्कृतिक परंपरांचे दर्शन घडते. अशाच घटना राज्यांच्या राजधानीत घडतात जेथे वैयक्तिक राज्यांचे मुख्यमंत्री राष्ट्रध्वज फडकवतात, त्यानंतर परेड आणि स्पर्धा होतात. १९७३ पर्यंत राज्याचे राज्यपाल राज्याच्या राजधानीत राष्ट्रध्वज फडकावत असत. फेब्रुवारी १९७४ मध्ये, तामिळनाडूचे मुख्यमंत्री, एम. करुणानिधी यांनी तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्याकडे हा मुद्दा उचलून धरला की पंतप्रधानांप्रमाणेच मुख्यमंत्र्यांनाही स्वातंत्र्यदिनी राष्ट्रध्वज फडकावण्याची परवानगी देण्यात यावी. १९७४ पासून संबंधित राज्यांच्या मुख्यमंत्र्यांना स्वातंत्र्यदिनी राष्ट्रध्वज फडकावण्याची परवानगी आहे. भारतात सर्व ठिकाणी स्वातंत्र्य दिनाची सार्वजनिक सुट्टी दिली जाते. सर्व शाळा, महाविद्यालये-कार्यालयांमध्ये ध्वजारोहण व ध्वजवंदन असते. भारताचे पंतप्रधान हे दरवर्षी भाषण देतात. या दिवशी लाल किल्ला येथे भारताचे पंतप्रधान ध्वजारोहण करतात. त्यादिवशी बहुतांश रेडिओ केंद्रावर तसेच दूरदर्शनवर देशभक्तिपर गाणी, कार्यक्रम, चित्रपट लागतात. भारत सरकारने हर घर तिरंगा (प्रत्येक घरात तिरंगा) ही मोहीम देखील सुरू केली आहे. यात प्रत्येक घरामध्ये २५ च्या अनुदान दराने २०*३० इंच आकाराचा राष्ट्रध्वज वितरणाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.प्रत्येकाने आपल्या घरात अथवा कार्यालयात, संस्थेत १३ ते १५ ऑगस्ट २०२२ या काळात भारताचा राष्ट्रध्वज फडकवत ठेवणे असे या अभियानाचे स्वरूप आहे.

## लखनौच्या भूमीत महाराष्ट्राच्या समृद्ध संस्कृतीचा भव्य आविष्कार

मुंबई, दि. १४ : महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई यांच्यावतीने उत्तर प्रदेशची राजधानी लखनौ येथे आयोजित विशेष सांस्कृतिक कार्यक्रमात महाराष्ट्राच्या समृद्ध सांस्कृतिक परंपरेचे दर्शन घडविण्यात येणार आहे. महाराष्ट्राची भक्तीपरंपरा, लोककला, लोकसंस्कृती, सण-उत्सव आणि ऐतिहासिक वैभव यांचा कलात्मक आविष्कार 'नमन व दिंडी नृत्य' या विशेष सादरीकरणातून करण्यात येणार आहे. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वारशाचा देशाच्या विविध भागांत परिचय करून देण्याच्या उद्देशाने महाराष्ट्रातील कलाकारांचे विशेष पथक लखनौ येथे दाखल झाले आहे. हे सांस्कृतिक सादरीकरण सांस्कृतिक कार्य, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विकास मंत्री ड. आशिष शेलार यांच्या संकल्पनेतून तसेच सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली आणि सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक श्रीराम पांडे यांच्या नेतृत्वाखाली सादर करण्यात येणार आहे. 'नमन व दिंडी नृत्य' या सादरीकरणाची सुरुवात गणेशवंदना असलेल्या 'नमन' या पारंपरिक कलाप्रकाराने होणार आहे. त्यानंतर महाराष्ट्राच्या वारकरी संप्रदायाची भक्तीपरंपरा, लोकजीवन आणि सांस्कृतिक वारसा अधोरेखित करणारे दिंडी नृत्य सादर करण्यात येणार आहे. भक्तिभाव, पारंपरिक नृत्यशैली, लोकसंगीत आणि महाराष्ट्राची सांस्कृतिक ऊर्जा यांचा सुरेख संगम या सादरीकरणातून अनुभवता येणार आहे. या विशेष सांस्कृतिक सादरीकरणाचे टीम लीडर व नृत्यदिग्दर्शक ओंकार भास्कर रोकडे यांच्या नेतृत्वाखाली कलाकार सहभागी झाले आहेत. पारंपरिक नृत्य, वेशभूषा, भक्तिमय भाव आणि लोकपरंपरेतील कलाविष्कार यांच्या माध्यमातून महाराष्ट्राच्या सांस्कृतिक ओळखीचे प्रभावी दर्शन रसिकांना घडणार आहे. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वारशाचे जतन, संवर्धन आणि प्रसार करण्याबरोबरच राज्यातील विविध लोककला व सांस्कृतिक परंपरांना राष्ट्रीय स्तरावर व्यासपीठ उपलब्ध करून देणे हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश आहे. विविध राज्यांतील सांस्कृतिक परंपरांचे आदान-प्रदान वाढविणे आणि 'एक भारत, श्रेष्ठ भारत' या संकल्पनेला बळकटी देणे, यासाठी अशा सांस्कृतिक उपक्रमांचे महत्त्व आहे. महाराष्ट्राच्या कला, भक्ती आणि लोकपरंपरेचा देशाच्या विविध भागांत परिचय करून देण्यासाठी सांस्कृतिक कार्य संचालनालयामार्फत विविध उपक्रम सातत्याने राबविण्यात येत आहेत. या सांस्कृतिक पथकात टीम लीडर व नृत्यदिग्दर्शक ओंकार भास्कर रोकडे यांच्यासह कनक दावरी, प्राची कांबळे, स्वालिया विजापुरे, सोनाली सुतार, रिद्धी मेहर, आर्या कदम, पूनम मगदूम, वैष्णवी वरक, ऋतुजा पाटील आणि बियांका पाटील तसेच बबन शिंदे, प्रज्योत पाटील, आशुतोष चव्हाण, विकास कांबळे, ऋषिकेश चौधरी, सौरभ रोकडे, कहान दावरी, अरहम शेख, अजय काटे, पवन जोशी, बाहुबली राजमाने आणि ओंकार रोकडे सहभागी झाले आहेत. लखनौ येथे महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वारशाचे सादरीकरण करणारे हे विशेष पथक चार दिवस मुक्काम करून कार्यक्रमाच्या तयारीसह सांस्कृतिक सादरीकरणात सहभागी होत आहे. या माध्यमातून महाराष्ट्राच्या समृद्ध सांस्कृतिक परंपरेची ओळख उत्तर प्रदेशातील रसिकांना करून देण्याबरोबरच विविधतेतून एकतेचा आणि सांस्कृतिक बंधुभावाचा संदेश दिला जाणार आहे.

## स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव ते विकसित भारताचा संकल्प



१५ ऑगस्ट हा केवळ दिनदर्शिकेतील एक दिवस नाही, तर भारताच्या स्वातंत्र्यलढ्याची, बलिदानाची आणि राष्ट्रनिर्मितीच्या संकल्पाची आठवण करून देणारा राष्ट्रीय पर्व आहे. असंख्य स्वातंत्र्यसैनिकांनी आपल्या प्राणांची आहुती देऊन मिळवून दिलेल्या स्वातंत्र्याची किंमत पुढील पिढ्यांनी जाणून घेणे ही काळाची गरज आहे. आज आपण स्वातंत्र्याच्या अनेक दशकांचा प्रवास पूर्ण केला आहे. या काळात देशाने शेती, उद्योग, विज्ञान, तंत्रज्ञान, शिक्षण, संरक्षण आणि अंतराळ संशोधन अशा विविध क्षेत्रांत मोठी झेप घेतली. जगातील एक प्रभावशाली राष्ट्र म्हणून भारताची ओळख निर्माण होत आहे. मात्र विकासाची ही गती शेवटच्या घटकापर्यंत पोहोचणे तितकेच महत्त्वाचे आहे. देशाचा विकास केवळ मोठे महामार्ग, उंच इमारती किंवा आधुनिक तंत्रज्ञानाने मोजता येत नाही. गावातील शेतकऱ्याला योग्य मोबदला, तरुणांना रोजगार, विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण, महिलांना सुरक्षितता, सामान्य नागरिकांना पारदर्शक प्रशासन आणि प्रत्येकाला आरोग्याच्या सुविधा मिळाल्या तरच स्वातंत्र्याचा खरा अर्थ साकार होईल. लोकशाही ही केवळ मतदानापुरती मर्यादित नसून नागरिकांच्या हक्कांसोबत कर्तव्यांचीही जाणीव करून देणारी व्यवस्था आहे. भ्रष्टाचाराला विरोध करणे, सार्वजनिक मालमत्तेचे रक्षण करणे, पर्यावरण संवर्धन करणे, जात-धर्माच्या भिंती दूर करून सामाजिक सलोखा वाढवणे आणि कायद्याचा सन्मान करणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. आज देशासमोर बेरोजगारी, महागाई, शेतकऱ्यांच्या समस्या, पर्यावरणाचा ऱ्हास, पाण्याचे संकट आणि सामाजिक विषमता अशी अनेक आव्हाने आहेत. या प्रश्नांकडे केवळ राजकीय चष्म्यातून न पाहता त्यावर ठोस आणि दीर्घकालीन उपाययोजना करण्याची गरज आहे. सरकार कोणतेही असो, देशहित सर्वोच्च असले पाहिजे.

महाराष्ट्राच्या संदर्भातही ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास, सिंचन, रस्ते, आरोग्य, शिक्षण आणि रोजगाराच्या संधी यांना प्राधान्य मिळणे आवश्यक आहे. गावांचा विकास झाला तरच महाराष्ट्र आणि देश अधिक सक्षम बनेल.

स्वातंत्र्य आपल्याला संघर्षातून मिळाले; आता समृद्ध, सक्षम आणि न्याय्य भारत निर्माण करण्याची जबाबदारी आपल्या खांद्यावर आहे. नव्या पिढीने स्वातंत्र्याचा इतिहास केवळ पुस्तकात न वाचता त्यामागील त्याग आणि देशभक्ती आपल्या आचरणातून जपली पाहिजे. १५ ऑगस्टच्या या पवित्र दिवशी स्वातंत्र्यसैनिकांच्या बलिदानाला अभिवादन करून आपण एक संकल्प करूया-देश बदलण्याची सुरुवात दुसऱ्याकडून नव्हे, तर स्वतःपासून करूया.

# पिकांना नवसंजीवनी



मराठवाड्यात समाधानकारक सुरू असलेल्या पावसामुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. जायकवाडी धरणातील पाणीसाठा झपाट्याने वाढल्याने पिण्याच्या पाण्याबरोबरच सिंचनाचीही चिंता कमी झाली आहे. पावसामुळे पिकांना नवसंजीवनी मिळाली आहे.

मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर तसेच जालना जिल्ह्यातील तीनशे गावांना पाणीपुरवठा करणाऱ्या जायकवाडी धरणात मुबलक पाणीसाठा उपलब्ध झाला आहे. जायकवाडी धरण ६७.९९ टक्के भरले असून पावसाचा जोर आणखी कायम राहिल्यास भविष्यात पाण्याचा प्रश्न मिटणार आहे. नाशिक जिल्ह्यासह गोदावरी नदीच्या वरील भागातील पाणलोट क्षेत्रात दमदार पाऊस झाला. त्यामुळे हजारो गावांसाठी लाभदायक असलेल्या जायकवाडी धरणात मुबलक पाणीसाठा उपलब्ध झाला आहे. मागील महिन्याभरात झालेल्या पावसामुळे जायकवाडी धरणात २५ टीएमसी पाण्याची भर पडली आहे. मान्सूनच्या सुरुवातीला जायकवाडी धरणातील पाणीसाठा संपल्यात जमा होता. त्यामुळे मोठ्या प्रमाणात चिंता व्यक्त केली जात होती; परंतु जुलै महिन्यात नाशिकसह गोदावरीच्या वरील पाणलोट क्षेत्रात मुसळधार पाऊस झाला. त्यामुळे जायकवाडी धरणातील पाणीसाठ्यात झपाट्याने वाढ झाली. मराठवाड्यातील आठही जिल्ह्यात हलका व मध्यम स्वरूपाचा पाऊस सुरू असल्यामुळे पिकांना देखील नवसंजीवनी मिळाली आहे. मध्यंतरीच्या काळात मराठवाड्यातील काही जिल्ह्यात पाऊस गायब झाल्यामुळे शेतकऱ्यांवर दुबार पेरणीची वेळ येते की काय अशी परिस्थिती निर्माण झाली होती. पाऊस नसल्यामुळे शेतकरी चिंतेत होते. गेल्या आठ दिवसांपासून छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, हिंगोली, परभणी, नांदेड, धाराशिव, लातूर या जिल्ह्यात समाधानकारक पाऊस सुरू आहे. अलीकडच्या पावसामुळे मराठवाड्यातील पिकांना नवसंजीवनी मिळाली आहे. यामुळे शेतकऱ्यांच्या जीवात जीव आला आहे. मराठवाड्यात येत्या दोन दिवसांत जोरदार पाऊस पडणार असल्याचा अंदाज हवामान खात्याने व्यक्त केला आहे. मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर, जालना आणि बीड जिल्ह्यात २४ तासांत ८९ मंडळात हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची नोंद झाली आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील ३७, जालना जिल्ह्यातील २४ आणि बीड जिल्ह्यातील २८ मंडळांचा यामध्ये समावेश आहे. या तीन जिल्ह्यांत पावसाचा जोर कमी असल्याने आगामी काळातील पर्जन्यमानावर धरणांमध्ये जमणारा जलसाठा आणि पाणीसाठ्याचे भवितव्य अवलंबून आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील भावसिंगपुरा, बालानगर, लोहगाव, पाचोड, विहामांडवा, गाजगाव, आसेगाव, सिद्धनाथ, वडगाव, करंजखेड, नाचनवेल, जरंडी, बनोटी या ठिकाणी दहा मिलिमीटर पेक्षा अधिकचा पाऊस झाला, तर बीड जिल्ह्यातील पिंपळनेर, गेवराई, धोंडराई, गंगामसला, नांदुर घाट, हनुमंत पिंपरी, केज, नागापूर या ठिकाणी देखील जवळपास १५ मिलिमीटरपेक्षा अधिकचा पाऊस झाला. त्यापैकी नांदूरघाट येथे सर्वाधिक ३० मिलिमीटर पाऊस झाल्याची नोंद आहे. जालना जिल्ह्यात भोकरदन तालुक्यात ४.२ तसेच जाफराबाद ३.९, जालना २.२, अंबड ४.८, परतुर २.८, बदनापूर १.६, घनसांगवी ३.८ आणि मंठा ०.९ मिलिमीटर पाऊस गेल्या २४ तासांत झाला. जायकवाडी धरणात मुबलक पाणीसाठा उपलब्ध झाल्याने छत्रपती संभाजीनगर तसेच जालना जिल्ह्यातील पिण्याच्या पाण्याची गरज भागली जाणार आहे. याबरोबरच या धरणातून जवळपास ३०० गावांना पाणीपुरवठा होतो. तसेच औद्योगिक वापरासाठी वर्षभर पुरेल एवढा पाणीसाठा सध्या जायकवाडी धरणात उपलब्ध झाला आहे. नांदेड, परभणी, हिंगोली या तीन जिल्ह्यांत गेल्या दोन दिवसांपासून मोठा पाऊस सुरू आहे. त्यामुळे शेतकरी देखील समाधानी आहेत. पिकांना जीवदान मिळाल्यामुळे दुबार पेरणीचे संकट शेतकऱ्यांवर येणार नाही हे मात्र निश्चित आहे. लातूर तसेच धाराशिव जिल्ह्यातही चांगला पाऊस सुरू आहे. एकंदरीत मराठवाड्यातील पिकांची परिस्थिती समाधानकारक मानली जात आहे. शेतकरी समाधानी असून खरीप हंगामासाठी सिंचनाची उपलबधता आणि पिण्याच्या पाण्याची भविष्यातील गरज लक्षात घेता पाण्याची आवक वाढल्यास संपूर्ण मराठवाड्याची चिंता मात्र नक्कीच मिटणार आहे संपूर्ण मराठवाड्यात येत्या दोन दिवसांत मुसळधार पाऊस पडणार आहे. नांदेड व लातूर जिल्ह्यात ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे, तर हिंगोली, परभणी, जालना, बीड, धाराशिव या जिल्ह्यात तुरळक ठिकाणी जोरदार पावसाचा येलो अलर्ट देण्यात आला आहे. शुक्रवार आणि शनिवारपर्यंत नांदेड, लातूर, बीड जिल्ह्यांत विजांसह वादळी पावसाचा अंदाज वर्तविण्यात आला आहे. मान्सूनच्या सुरुवातीला मराठवाड्यातील पिकांबद्दल चिंता व्यक्त केली जात होती. शेतकऱ्यांचे संपूर्ण आयुष्यमान शेती आणि पिकांवर अवलंबून असते. निसर्गाने कृपा केली तर शेतकरी ताठ मानेने जगू शकतो; परंतु निसर्गाची अवकृपा झाली तर शेतकऱ्यांच्या हातातील पिके निघून जातात. त्यामुळे संपूर्ण बाजारपेठेवर त्याचा परिणाम होतो. अलीकडच्या वातावरणामुळे तसेच पावसामुळे मराठवाड्यातील पिके तरारली आहेत. सध्याच्या परिस्थितीला तरी पिकांसाठी आवश्यक असलेला पाऊस पडलेला असल्यामुळे मराठवाड्यातील शेतकरी समाधानी आहे. पावसामुळे पिकांना जीवदान तर मिळाले पण आणखी मोठा पाऊस झाला तर मराठवाड्यातील आठही जिल्ह्यांतील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न पूर्णपणे मिटणार आहे. तसेच जनावरांसाठी लागणाऱ्या पाण्याचा प्रश्नही भविष्यातील पावसामुळे सुटू शकतो.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक शामसुंदर चितोडा यांनी **जगमित्र ऑफसेट भोकरदन नाका, संभाजीनगर ता.जि.जालना ४३१२०३ (महाराष्ट्र)** येथे छापून, दैनिक चकमक कार्यालय जालना येथे प्रसिध्द केले. पि.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी * यांची राहील. **संपादक शामसुंदर चितोडा, कार्यकारी संपादक कैलास फुलारी** (जालना जिल्हा न्यायालयाअंतर्गत) RNI NO. MHMAR/rni/reg.no.mahmar/59900/93/A4110 **मो.न.९४२२७९६०८८, ९४०३४९४४२२**

# तुकाराम मुंढेंची मुंबईत फिल्मसिटीवर, पुण्यात बर्गर किंगवर तर नाशकात झेप्टोवर धाड; FDA-च्या कारवाईत सापडलं ते फारच धक्कादायक

हाराष्ट्रात अन्नपदार्थांची गुणवत्ता आणि स्वच्छता तपासण्यासाठी अन्न व औषध प्रशासनाने कारवाईचा वेग वाढवला आहे. 'सेफ फूड, सेफ महाराष्ट्र' या मोहिमेअंतर्गत मुंबई, पुणे आणि नाशिकमध्ये विविध खाद्य आस्थापनांची तपासणी करण्यात आली. या कारवाईत स्वच्छता, अन्न हाताळणी आणि अन्नसुरक्षा नियमांशी संबंधित त्रुटी आढळल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे. ऋऊ- आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम राबवली जात असून, नियमांचे उल्लंघन करणाऱ्या व्यावसायिकांवर कठोर कारवाईचा इशारा देण्यात आला आहे. नाशिकच्या सिडको परिसरातील झेप्टोच्या आस्थापनाची १३ ऑगस्ट रोजी ऋऊ- अधिकाऱ्यांनी तपासणी केली. या तपासणीदरम्यान स्वच्छता आणि आरोग्यविषयक निकषांचे पालन होत नसल्याचे प्रशासनाच्या निदर्शनास आले. अन्नसुरक्षा नियमांमधील परिशिष्ट-४ मधील आवश्यक निकषांचे उल्लंघन झाल्याचे आढळल्यानंतर संबंधित आस्थापनाचा अन्न परवाना तात्काळ निलंबित करण्यात आला. अन्न सुरक्षा अधिकारी वैभव गर्दे आणि अमित रासकर यांनी ही तपासणी केल्याची माहिती आहे.

मुंबईतील गोरेगाव येथील दादासाहेब फाळके चित्रनगरी म्हणजेच फिल्मसिटी परिसरातील स्टुडिओ क्रमांक १३ मधील 'बॉलीवूड कॅफे'चीही ऋऊ-कडून विशेष तपासणी करण्यात आली. प्रशासनाच्या म्हणण्यानुसार, कॅफेमधील भांडी आणि परिसराची स्वच्छता समाधानकारक नव्हती. स्वयंपाकघरात घाणेरडे पाणी, कचरा आणि अन्नाचे अवशेष आढळल्याचे सांगण्यात आले. याशिवाय परिसरात मोठ्या प्रमाणावर माशांचा प्रादुर्भाव



मुंबईत फिल्मसिटीवर, पुण्यात बर्गर किंगवर तर नाशकात झेप्टोवर; तुकाराम मुंढेंच्या कारवाईत सापडलं ते फारच धक्कादायक

असल्याचेही तपासणीत निदर्शनास आले.

गंजलेल्या पृष्ठभागावर अन्न तयार केल्याचा आरोप फिल्मसिटीतील तपासणीमध्ये आणखी गंभीर बाब समोर आल्याचे प्रशासनाने म्हटले आहे. गंजलेल्या आणि अस्वच्छ अन्न-संपर्क पृष्ठभागांवर अन्न तयार केले जात असल्याचे आढळले. अशा परिस्थितीत अन्न दूषित होण्याचा धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळे संबंधित कॅफेला अन्नसुरक्षा आणि स्वच्छतेचे निर्धारित निकष काटेकोरपणे पाळण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. आढळलेल्या त्रुटींच्या आधारे अन्न सुरक्षा व मानदे कायदा, २००६ अंतर्गत पुढील दंडात्मक कारवाईची प्रक्रिया सुरू असल्याचे प्रशासनाने सांगितले आहे.

पुण्यातील कॅम्पमधील बर्गर किंगवरही कारवाई पुण्यातील कॅम्प परिसरातील प्रसिद्ध बर्गर किंग आस्थापनाचीही ऋऊ-कडून तपासणी करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. अस्वच्छतेशी संबंधित त्रुटी आढळल्याने संबंधित अन्न परवाना निलंबित करण्यात आल्याचे सांगण्यात येत आहे. दरम्यान, कारवाईनंतर ग्राहकांना आस्थापनाबाबत योग्य माहिती न देता बाहेर काम सुरू असल्यामुळे आस्थापना बंद असल्याचा फलक लावण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. या आस्थापनाबाबत यापूर्वीही तक्रारी प्राप्त झाल्याचे सांगितले जात आहे. मात्र या आरोपांबाबत संबंधित प्रशासनाची अंतिम अधिकृत माहिती महत्त्वाची ठरणार आहे.

खाद्य व्यवसायांसाठी ऋऊ-चा स्पष्ट इशारा

या कारवायांमधून महाराष्ट्रातील खाद्य व्यवसायांसाठी ऋऊ-ने स्पष्ट संदेश दिला आहे. अन्नाची चव जितकी महत्त्वाची, तितकीच त्याची स्वच्छता आणि सुरक्षितताही महत्त्वाची आहे. सह आयुक्त मंगेश माने आणि सहायक आयुक्त ज्ञानेश्वर महाले यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष तपासणी मोहीम सुरू आहे. अन्न तयार करण्याची जागा, भांडी, अन्न-संपर्क पृष्ठभाग, कीटक नियंत्रण, पाणी आणि स्वच्छता यांसह विविध बाबी तपासल्या जात आहेत. त्यामुळे ग्राहकांनीही संशयास्पद किंवा अस्वच्छ खाद्य आस्थापनांबाबत तक्रार करण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

पान ४ वरून...

## स्वातंत्र्यदिनी आरोग्यमंत्री

होण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. निवडक सदस्यांसोबत थेट द्विमार्गी संवादासाठी स्वतंत्र इको लिंक उपलब्ध करून देण्यात येणार असून, इतर समिती सदस्यांसाठी यू ट्यूब व ब्रॉडकास्ट लिंकद्वारे कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण उपलब्ध राहणार आहे. १२४ आरोग्य संस्थांचे ऑनलाइन उद्घाटन

स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने राज्यातील विविध भागांत नव्याने उभारण्यात आलेल्या तसेच कार्यान्वित झालेल्या १२४ आरोग्य संस्थांचे ऑनलाइन उद्घाटनही करण्यात येणार आहे. उपलब्ध नियोजनानुसार प्राथमिक आरोग्य केंद्रे, उपकेंद्रे, तालुका सार्वजनिक आरोग्य युनिट, सार्वजनिक आरोग्य युनिट, शहरी आरोग्य व कल्याण केंद्र यांसह विविध आरोग्य संस्थांचा यात समावेश आहे. यामध्ये ग्रामीण भागासोबतच महानगरपालिका क्षेत्रातील शहरी आरोग्य वर्धिनी केंद्रांचाही समावेश असून, नागरिकांना त्यांच्या घराजवळ गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्याच्या शासनाच्या प्रयत्नांना यामुळे अधिक बळ मिळणार आहे.

लोकसहभागातून सक्षम होणार आरोग्य व्यवस्था

आरोग्य व्यवस्था ही केवळ शासकीय यंत्रणेची जबाबदारी न राहता त्यामध्ये नागरिकांचा सक्रिय सहभाग असावा, या उद्देशाने आरोग्य समित्यांची भूमिका महत्त्वाची ठरत आहे. त्यामुळे स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांचा समिती सदस्यांशी होणारा हा थेट संवाद आरोग्य व्यवस्थेला अधिक लोकाभिमुख करण्याच्या दृष्टीने महत्वपूर्ण ठरणार आहे.

गावातील आरोग्यविषयक प्रश्न थेट शासनापर्यंत पोहोचविणे, स्थानिक पातळीवरील चांगले उपक्रम जाणून घेणे, आरोग्य सेवांच्या अंमलबजावणीतील अडचणी समजून घेणे आणि नागरिकांच्या सहभागातून आरोग्य व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी आवश्यक उपाययोजनांना गती देणे, हा या जनसंवादाचा प्रमुख उद्देश आहे.

पान ४ वरून...

## सिल्क, सीड आणि

त्यांनी सांगितले. ***ड्रायपोर्टमुळे निर्यातीला मिळणार चालना***

जालना येथे ड्रायपोर्ट सुरू झाल्यामुळे रेशीम उत्पादनाला देशांतर्गत बाजारपेठे बरोबरच आंतरराष्ट्रीय बाजारपेठेशी जोडण्याची मोठी संधी उपलब्ध झाली आहे. एकेकाळी भारत जगाला रेशीम निर्यात करणारा देश होता. आता पुन्हा भारताने जागतिक रेशीम बाजारपेठेत आपले स्थान निर्माण करण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. जालना येथील रेशीम बाजारपेठ आणि ड्रायपोर्ट या दृष्टीने महत्त्वाची पायाभूत सुविधा ठरतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

***शेतकऱ्यांचे प्रशिक्षण आणि कौशल्यविकासावर भर***

रेशीम उद्योगाचा विस्तार करण्यासाठी अधिकाधिक शेतकऱ्यांना प्रशिक्षण देण्याची आवश्यकता आहे. रेशीम उत्पादनातील आधुनिक तंत्रज्ञान, प्रक्रिया, गुणवत्ता, बाजारपेठ आणि मूल्यवर्धन याबाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्याबरोबरच प्रशिक्षणासाठी डिजिटल माध्यमांचा वापर करावा. कौशल्यविकासाच्या माध्यमातून शेतकरी आणि महिलांना या संपूर्ण मूल्यसाखळीत सहभागी करून घेण्यावर आगामी काळात भर दिला जाईल, असे मुख्यमंत्री म्हणाले.

***गुन्हेगारीवर वचक आणि जलद न्याय***

गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी प्रभावी तपास आणि जलद न्यायप्रक्रिया आवश्यक असून, अलीकडील एका गंभीर गुन्ह्यात पोलिसांनी अल्पावधीत आरोपपत्र दाखल करून न्यायालयीन प्रक्रिया गतिमान केल्याबद्दल त्यांनी संबंधित पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांचे कौतुक केले. गुन्हेगारांवर कायद्याचा वचक निर्माण होण्यासाठी अशा प्रकारची जलद आणि प्रभावी कार्यवाही आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी आमदार अर्जुन खोतकर म्हणाले की, जालन्यात रेशीम (कोष) खरेदी केंद्राची सुरुवात करण्यात आली आहे. यामुळे आता शेतकरी बांधवांना न्याय मिळाला असून, पूर्वी रेशीम कोष विक्रीसाठी हजारो किलोमीटर दूर जावे लागणाऱ्या शेतकऱ्यांची मोठी सोय झाली आहे. आता जालन्यासाठी 'टेक्सटाईल पार्क' मंजुर करण्याची मागणी केली.

प्रारंभी जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी जालना जिल्ह्यातील रेशीम शेती व उद्योगातील संधीबाबत सादरीकरणाद्वारे माहिती सादर केली. यावेळी मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्या उपस्थितीत रेशीम उत्पादक शेतकरी आणि रेशीम खरेदी करणारे व्यापारी यांच्यातला पहिला रेशीम कोष लिलाव करण्यात आला. त्यानंतर त्यांच्या हस्ते घंटानाद करून पहिला रेशीम कोष लिलाव प्रक्रिया संपन्न झाली. यावेळी मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी घनसावंगी तालुक्यातील शेतकरी श्री. भागवत पंडीतराव भानुसे आणि श्री. भाऊसाहेब दत्ता निवदे यांचा सपत्नीक सत्कार केला. तसेच गंभीर गुन्ह्यात पोलिसांनी अल्पावधीत आरोपपत्र दाखल करून न्यायालयीन प्रक्रिया गतिमान राबविल्याबद्दल सरकारी वकील श्रीमती मुकीम यांचा सत्कार केला.

# ३ लाख तरुणींना रोजगार संधींसाठी राज्यस्तरीय अभियान राबविण्यात येणार सामंजस्य कराराचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून स्वागत

मुंबई, दि. १४ : महाराष्ट्रातील महिलांचा श्रमशक्ती सहभाग वाढविण्याच्या अनुषंगाने राज्य शासनाचा कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग आणि आयपीई ग्लोबल लिमिटेड यांच्यामध्ये सामंजस्य करार करण्यात आला आहे. आयपीई ग्लोबल लिमिटेड या संस्थेने महाराष्ट्र शासनासोबत भागीदारी करण्याची इच्छा व्यक्त केली होती. या भागीदारीचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वागत केले असून संबंधित विभागांकडून यासाठी आवश्यक सहकार्य करण्यात येणार असल्याची ग्वाहीही त्यांनी दिली. कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या नेतृत्वात हा उपक्रम महाराष्ट्रात यशस्वीपणे राबविण्यात येत आहे. महाराष्ट्रातील महिला श्रमशक्तीमध्ये सातत्याने वाढ झाली असून तो, १८ ते २९ या वयोगटासाठी, २०१८-१९ मधील २०.२ टक्क्यांवरून २०२३-२४ मध्ये २६.६ टक्क्यांपर्यंत पोहोचला आहे. महिलांचे कौशल्यविकास, उद्योजकतेला प्रोत्साहन आणि उपजीविकेच्या संधींचा विस्तार करण्यासाठी राज्य शासनाच्या विविध उपक्रमांचा यामध्ये महत्त्वाचा वाटा आहे. या पार्श्वभूमीवर १५ ते २९ वर्षे वयोगटातील आणखी ३ लाख तरुणींना खासगी क्षेत्रातील वेतनाधारित रोजगार उपलब्ध करून देण्याचे प्रस्तावित आहे. विविध संबंधित विभागांच्या प्रयत्नांमध्ये समन्वय साधून हे अभियान राबविण्यात येणार आहे. यासाठी राज्य व विभागीय स्तरावर तांत्रिक सहाय्य देणे, उद्दिष्टे निश्चित करणे, आवश्यक साधने व मदत उपलब्ध करून देणे तसेच खासगी क्षेत्राला त्यांच्या मनुष्यबळात महिलांचे प्रमाण वाढविण्यासाठी प्रोत्साहित करणे प्रस्तावित आहे. २०२६ ते २०३० कालावधीतील कार्यक्रमाचा उद्देश कौशल्य प्रशिक्षणातून रोजगाराकडे होणारे संक्रमण अधिक प्रभावी करणे, महिलांसाठी सक्षम कार्यस्थळांचे वातावरण निर्माण करणे आणि रोजगारातील अडथळे दूर करणे हा आहे. राज्यस्तरीय अभियान, विविध विभागांमधील कौशल्यविकास उपक्रमांचे बळकटीकरण, लिंगविषयक माहिती व ज्ञानव्यवस्थेची निर्मिती आणि महिलांसाठी अनुकूल रोजगार व पायाभूत सुविधांसाठी खासगी क्षेत्रातील गुंतवणूक वाढविणे या माध्यमातून कार्यक्रम राबविण्यात येणार आहे. महिला श्रमशक्ती सहभाग वाढविण्यासाठी महिला व बालविकास, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता, नगरविकास, ग्रामविकास व पंचायतराज, उद्योग, ऊर्जा व कामगार, आदिवासी विकास, सामाजिक न्याय, कृषी, अल्पसंख्याक विकास, पर्यावरण व हवामान बदल, सहकार, उच्च व तंत्रशिक्षण, मत्स्यव्यवसाय यांसह संबंधित विभागांमध्ये अधिक समन्वय व सहकार्य आवश्यक असल्याचे प्रस्तावात नमूद करण्यात आले आहे. कार्यक्रमाची प्रमुख उद्दिष्टे वेतनाधारित रोजगारात प्रमुख क्षेत्रांमध्ये सहभागी होणाऱ्या तरुण महिलांची संख्या वाढविणे. कौशल्य प्रशिक्षणातून रोजगाराकडे



जाणाऱ्या मार्गिका अधिक प्रभावी करून रोजगार मिळण्याचे प्रमाण वाढविणे. सार्वजनिक-खासगी भागीदारीच्या माध्यमातून लिंगसमावेशक कार्यस्थळांना प्रोत्साहन देणे. महिलांच्या रोजगारातील सहभागाला पूरक पायाभूत सुविधांपर्यंत त्यांचा प्रवेश वाढविणे.कार्यक्रमासाठी चार धोरणात्मक स्तरांवर काम करण्याचे प्रस्तावित आहे. यामध्ये राज्यस्तरीय अभियान सुरू करणे, महिलांसाठीच्या कौशल्यविकास योजनांची गुणवत्ता व परिणामकारकता वाढविणे, कार्यपद्धती व कामगिरी व्यवस्थापनात सुधारणा करणे तसेच महिलांसाठी समावेशक रोजगारनिर्मितीसाठी खासगी क्षेत्राचा सहभाग वाढविणे यांचा समावेश आहे.महिलांसाठी वाहतूक, वसतिगृहे, स्वच्छता यांसारख्या लिंगसमावेशक पायाभूत सुविधांमध्ये गुंतवणूक वाढविणे, प्रशिक्षण व रोजगार केंद्रांमध्ये गुणवत्तापूर्ण वसतिगृहांची उपलब्धता वाढविणे तसेच महिलांसाठी मोफत किंवा अनुदानित वाहतूक सुविधा उपलब्ध करून देण्याचाही प्रस्ताव आहे.

२०३० पर्यंत अपेक्षित परिणाम

तीन लाख तरुणींना वेतनाधारित रोजगार, अतिरिक्त १.५ लाख तरुणींना रोजगाराभिमुख अभ्यासक्रमांचे प्रशिक्षण, काम करणाऱ्या प्रत्येक १,००० महिलांमागे उपलब्ध कार्यक्षम वसतिगृहांच्या खाटांमध्ये ७५ टक्के वाढ करून महिलांना अधिकाधिक वेतनाधारित आणि सुरक्षित रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देऊन त्यांच्या आर्थिक सक्षमीकरणाला चालना देणे, हा या प्रस्तावित कार्यक्रमाचा प्रमुख उद्देश आहे.

# माती वाचवा, पाणी जपा, सुरक्षित भविष्य घडवा

महाराष्ट्राच्या विकासाच्या वाटचालीत माती आणि पाणी या दोन नैसर्गिक संसाधनांचे अनन्यसाधारण महत्व आहे. शेती, ग्रामीण अर्थव्यवस्था, पर्यावरण आणि मानवी जीवन यांचा थेट संबंध या दोन्ही घटकांशी आहे. त्यामुळे मातीचे संवर्धन आणि पाण्याचे शाश्वत व्यवस्थापन ही केवळ शासनाची जबाबदारी न राहता ती व्यापक लोकचळवळ बनणे ही काळाची गरज आहे. याच विचारातून राज्यात यंदा २१ ऑगस्ट हा 'जलसंधारण दिन' म्हणून साजरा करण्यात येणार आहे. माजी मुख्यमंत्री दिवंगत सुधाकरराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त साजरा होणारा हा दिवस त्यांच्या जलसंधारणविषयक दूरदृष्टीला अभिवादन करण्याबरोबरच महाराष्ट्राच्या जलसुरक्षित भविष्यासाठी नव्या संकल्पाची सुरुवात ठरणार आहे.

दिवंगत सुधाकरराव नाईक यांनी मुख्यमंत्री म्हणून काम करताना राज्यासमोरील दुष्काळ आणि पाणीटंचाईचे आव्हान केवळ मोठ्या धरणांच्या माध्यमातून सोडविता येणार नाही, हे ओळखले. पावसाचा प्रत्येक थेंब अडविणे, तो जमिनीत मुरविणे आणि स्थानिक पातळीवरील जलस्रोतांचे पुनरुज्जीवन करणे आवश्यक आहे, या भूमिकेतून त्यांनी 'पाणी अडवा, पाणी जिरवा' हा मूलमंत्र दिला. पाणलोट विकास, भूजल पुनर्भरण, पाझर तलाव, गाव तलाव, नाला बांध, माती बंधारे आणि अन्य छोट्या जलसंधारण संरचनांवर त्यांनी भर दिला. जलसंधारणाला स्वतंत्र प्रशासकीय दिशा देत त्यांनी या विषयाला लोकसहभागाची जोड दिली. १९९१ ते १९९३ या काळात महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून त्यांनी घेतलेले अनेक निर्णय आजही दिशादर्शक ठरतात. ग्रामीण भागातील रोजगार निर्मिती आणि जलसंधारणाची कामे यांची सांगड घालून त्यांनी जलस्रोत निर्मितीला चालना दिली. जलसंधारण हे केवळ अभियांत्रिकीचे काम नसून गावागावातील नागरिकांच्या सहभागातून उभे राहणारे अभियान आहे, ही भूमिका त्यांच्या कार्यातून स्पष्ट झाली. आज जलयुक्त शिवार, भूजल पुनर्भरण, पाणलोट विकास यांसारख्या विविध उपक्रमांमध्ये त्यांच्या विचारांचे प्रतिबिंब दिसून येते. याच योगदानाची दखल घेत दिवंगत सुधाकरराव नाईक यांचा स्मृतिदिन १० मे हा २००३ पासून जलसंधारण दिन म्हणून साजरा केला जात होता. मात्र, स्मृतिदिनाऐवजी जन्मदिवस अधिक उत्साहपूर्ण आणि लोकसहभागातून साजरा व्हावा, या विचारातून मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी विभागातील अधिकारी, सामाजिक कार्यकर्ते आणि संबंधित घटकांशी चर्चा करून २१ ऑगस्ट हा दिवस जलसंधारण दिन म्हणून साजरा करण्यासाठी पुढाकार घेतला. मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांनी यास मान्यता दिल्यानंतर शासनाने त्याबाबतचा निर्णय घेतला. त्यामुळे यापुढे दरवर्षी २१ ऑगस्ट हा दिवस महाराष्ट्राच्या जलसंधारण चळवळीचा महत्त्वपूर्ण दिवस ठरणार आहे.

व्यापक जनसहभागाची जोड यंदाचा जलसंधारण दिन केवळ औपचारिक कार्यक्रमांपुरता मर्यादित न ठेवता त्याला व्यापक जनसहभागाची जोड देण्यात आली आहे. १५ ते २१ ऑगस्टदरम्यान 'जलसंधारण सप्ताह', तर १५ ऑगस्ट २०२६ ते २६ जानेवारी २०२७ या कालावधीत 'जलसंधारण अभियान' राबविण्यात येणार आहे. शाळा, महाविद्यालये, ग्रामपंचायती, स्थानिक स्वराज्य संस्था, स्वयंसेवी संस्था, सामाजिक संस्था आणि विविध प्रशासकीय यंत्रणांच्या माध्यमातून जलसंधारणाचा संदेश घराघरात पोहोचविण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. या अभियानातील सर्वात आकर्षक उपक्रम म्हणजे 'महा वॉकेथॉन २०२६ - वॉक फॉर वॉटर'.



२१ ऑगस्ट रोजी सकाळी राज्यातील सर्व जिल्ह्यांच्या ठिकाणी एकाच वेळी तीन किलोमीटरची महा वॉकेथॉन आयोजित करण्यात येणार आहे. प्रत्येक जिल्ह्यात किमान दहा हजार नागरिकांच्या सहभागाचे उद्दिष्ट असून, राज्यभरातून तीन लाखांहून अधिक नागरिक प्रत्यक्ष सहभागी होण्याची अपेक्षा आहे. नागरिक, युवक-युवती, विद्यार्थी, महिला, लोकप्रतिनिधी, अधिकारी-कर्मचारी, राष्ट्रीय छात्र सेना, राष्ट्रीय सेवा योजना, 'माय भारत', क्रीडा संस्था, स्वयंसेवी संस्था, उद्योग क्षेत्र, कलाकार आणि विविध क्षेत्रांतील मान्यवर या उपक्रमात सहभागी होणार आहेत. ही केवळ चालण्याची स्पर्धा नसून जलसंधारणासाठी जनजागृतीची सामूहिक पावले आहेत. वॉकथॉनच्या प्रारंभी सहभागी नागरिकांकडून मृद व जलसंधारणाची सामूहिक शपथ घेतली जाणार आहे. पाण्याचा प्रत्येक थेंब जपणे, मातीची धूप रोखणे, पावसाचे पाणी अडविणे आणि जलस्रोतांचे संवर्धन करणे याबाबत नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. 'माती वाचवा, पाणी जपा, सुरक्षित भविष्य घडवा' हा यंदाच्या अभियानाचा मुख्य संदेश आहे. 'पाणी अडवा, पाणी जिरवा, जलयुक्त महाराष्ट्र घडवा' हा संदेशही या चळवळीला दिशा देणार आहे. युवकांचा सहभाग वाढविण्यासाठी डिजिटल माध्यमांचाही प्रभावी वापर करण्यात येणार आहे. 'रील फॉर सॉईल ण्ड वॉटर कन्झर्वेशन' या उपक्रमातून १५ ते ३० वयोगटातील युवक-युवतींना मृद व जलसंधारणाचा संदेश सर्जनशील पद्धतीने मांडण्याची संधी मिळणार आहे. ३० ते ६० सेकंदांच्या इन्स्टाग्राम रिल्सच्या माध्यमातून मातीची धूप, पाणी बचत, पावसाच्या पाण्याचे संकलन, शेततळी, बंधारे, वृक्षारोपण, भूजल पुनर्भरण आणि पर

पान १ वरुन...

## माळशेंद्रा-गोंदेगाव-बावणे

मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, जालना जिल्ह्याच्या तत्कालीन पालकमंत्री पंकजाताई मुंडे तसेच जिल्हाधिकारी, जालना यांच्याकडे वेळोवेळी निवेदने देऊन रस्त्याचा प्रश्न मार्गी लावण्याची मागणी करण्यात आली आहे. मात्र अद्याप या प्रश्नावर अपेक्षित तोडगा निघालेला नसल्याने आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदन सादर करून तातडीने निधी उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली आहे.

**पाच-सहा गावांना होणार थेट फायदा**

माळशेंद्रा-गोंदेगाव-बावणे पांगरी इजिमा क्र. १९ हा रस्ता जालना-देऊळगाव आणि जालना-भोकरदन या दोन्ही राज्यमहामार्गांना जोडल्यास परिसरातील पाच-सहा गावांच्या दळणवळणाचा प्रश्न मोठ्या प्रमाणात सुटणार आहे.

या रस्त्यामुळे विद्यार्थ्यांना शाळा-महाविद्यालयात जाणे सुलभ होईल. रुग्णांना उपचारासाठी जालना शहरात पोहोचणे सोपे होईल. तसेच शेतमालाची वाहतूक, बाजारपेठेशी संपर्क आणि नागरिकांच्या दैनंदिन प्रवासाला मोठी सुविधा उपलब्ध होणार आहे.

**निधी उपलब्ध करून देण्याची मागणी**

माळशेंद्रा-गोंदेगाव-बावणे पांगरी इजिमा क्र. १९ ला दोन्ही राज्यमहामार्गांशी जोडण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करून तातडीने निधी उपलब्ध करून द्यावा, तसेच माळशेंद्रा येथील नदीवरील पुलाचे काम मंजूर करून परिसरातील पाच-सहा गावांची दळणवळण व्यवस्था मजबूत करावी, अशी मागणी ग्रामपंचायतीच्या वतीने करण्यात आली आहे. शासनाने या मागणीची गांभीर्याने दखल घेऊन अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला रस्त्याचा प्रश्न मार्गी लावावा, अशी अपेक्षा सरपंच विजय नामदेव लहाणे आणि उपसरपंच शिवाजी पाटील जाधव यांनी निवेदनाद्वारे व्यक्त केली आहे.

पान १ वरुन...

पान १ वरुन...

## नवीन जालना भागातील

व मोठे खेळाचे मैदान नाही. महानगरपालिकेने विकास आराखड्यात नवीन जालन्यात ड्ठझ्रऋ च्या दीडशे एकरहून अधिक असलेल्या जागेपैकी २० एकर जागेवर उद्यान व खेळाचे मैदान प्रस्तावित केलेले आहे. शहरालगत असलेल्या मंठा चौफुली या भागातील जागेत संबंधित आरक्षण विकसित करून तेथे एक मोठे उद्यान, जलतरण तलाव, १२०० आसन क्षमतेचे भव्य नाट्यगृह-सभागृह व मोठे खेळाचे मैदान इ. सुविधा उभारण्यासाठी महानगरपालिकेला २५ कोटींचे विशेष अनुदान देण्यात यावे. सदरील महानगरपालिकेने उद्यान व इतर सुविधा विकसित केल्यावर देखभाल-दुरुस्तीसाठी ड्ठझ्रऋ कडेच हस्तांतर करून शहरातील नागरिकांसाठी ते खुले ठेवावे. जेणेकरून जालना शहराच्या वैभवात भर पडेल व नागरिकांना या सर्व सुविधांचा लाभ घेता येईल. देखभाल दुरुस्ती SRPF कडे राहत असल्यामुळे व नाममात्र दरात नागरिकांना प्रवेशिका लावल्यास निश्चित स्वरूपाचे उत्पन्नही मिळेल. करिता जालना शहराच्या विकासासाठी व नागरिकांच्या सुविधेसाठी आपण २५ कोटी रुपयांचा निधी विशेष बाब म्हणून महानगरपालिकेला द्यावा अशी मागणी नगरसेवक अश्विन अंबेकर यांनी केली. यापूर्वीही त्यांनी महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत याबाबत जोरदार मागणी केली असून मा.आयुक्त यांना भेटूनही याबाबत विनंती केली आहे.

# सिल्क, सीड आणि स्टीलची सिटी म्हणून आता जालना जिल्हा ओळखला जाणार : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## रेशीम उत्पादनाच्या 'जालनाई ब्रँड 'चा जालन्यातून देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते शुभारंभ

जालना/प्रतिनिधी : जालना जिल्ह्याची ओळख आता 'सिल्क, सीड आणि स्टील' अर्थात 'ट्रिपल एस सिटी' म्हणून निर्माण झाली असून, रेशीम उद्योगाच्या माध्यमातून जिल्ह्यात नव्या अर्थव्यवस्थेला चालना मिळत आहे. कापूस आणि सोयाबीन या पारंपरिक नगदी पिकांना पर्याय म्हणून रेशीम शेतीला प्रोत्साहन देतानाच उत्पादनापासून प्रक्रिया, वस्त्रनिर्मिती, ब्रँडिंग आणि बाजारपेठेपर्यंतची संपूर्ण मूल्यसाखळी जालन्यात विकसित करण्यावर शासनाचा भर आहे. यामुळे अल्पभूधारक शेतकऱ्यांनाही अधिक उत्पन्नाचे साधन उपलब्ध होऊन जालना देशातील महत्त्वाचे रेशीम केंद्र म्हणून पुढे येईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

जालना येथे नव्याने उभारण्यात आलेल्या रेशीम बाजारपेठेच्या नवीन इमारत लोकार्पण सोहळ्यात ते बोलत होते. यावेळी पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन तथा पालकमंत्री पंकजा मुंडे, वस्त्रोद्योग राज्यमंत्री संजय सावकारे, लोकसभा सदस्य कल्याण काळे, जालना महानगर पालिकेच्या महापौर वंदना मगरे, आमदार अर्जुन खोतकर, आमदार बबनराव लोणीकर, आमदार नारायण कुचे, आमदार संतोष दानवे, आमदार हिकमत उढाण, माजी मंत्री राजेश टोपे, माजी आमदार अरविंद चव्हाण, माजी आमदार विलास खरात, वस्त्रोद्योग विभागाच्या सचिव शैला ए., छत्रपती संभाजीनगर, विभागीय आयुक्त जी. श्रीकांत, रेशीम संचालनालय संचालक नागपूर विनय मुन, पोलीस महानिरीक्षक विरेंद्र कुमार मिश्र, जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, जिपचे मुख्य कार्यकारी अधिकारी कृष्णकांत कनवारिया, महानगरपालिका आयुक्त अंजली शर्मा, पोलीस अधिक्षक तेघबीरसिंग संधु यांची उपस्थिती होती.





*रेशीम बाजारपेठेमुळे शेतकऱ्यांना थेट बाजारपेठ उपलब्ध*

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, जालन्याला 'सिल्क सिटी' करण्याच्या दिशेने जिल्हा प्रशासनाने केलेले नियोजन कौतुकास्पद आहे. रेशीम उद्योगातून मोठ्या प्रमाणात अर्थव्यवस्था निर्माण होण्याची क्षमता आहे. नव्याने सुरू झालेल्या रेशीम बाजारपेठेमुळे उत्पादक शेतकऱ्यांना आपल्या मालासाठी थेट बाजारपेठ उपलब्ध झाली आहे. पहिल्या लिलावाला मिळालेला प्रतिसाद उत्साहवर्धक असून शेतकऱ्यांच्या उत्पादनाला अधिकाधिक चांगला दर मिळावा, यासाठी व्यापारी आणि संबंधित यंत्रणांनी प्रयत्न करावेत, असे आवाहन त्यांनी केले.

*कापूस–सोयाबीनला रेशीम शेतीचा पर्याय*

मागील अनेक वर्षांपासून शेतकरी कापूस आणि सोयाबीन या प्रमुख नगदी पिकांवर अवलंबून आहेत. या पिकांची उत्पादकता वाढविण्यासाठी प्रयत्न सुरू असले तरी शेतकऱ्यांना पर्यायी नगदी पिकांचा पर्याय देणे आवश्यक आहे. रेशीम शेती हा त्यासाठी अत्यंत चांगला पर्याय असून, अल्पभूधारक शेतकऱ्यांनाही यातून चांगले उत्पन्न मिळविण्याची संधी आहे. त्यामुळे अधिकाधिक शेतकऱ्यांना रेशीम शेतीकडे वळविण्यासाठी प्रशिक्षण आणि तंत्रज्ञानाची जोड देणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

**उत्पादनापासून वस्त्रनिर्मितीपर्यंत संपूर्ण मूल्यसाखळी**

केवळ रेशीम उत्पादन करून उपयोग नाही, तर त्यापुढील प्रक्रिया, धागानिर्मिती, वस्त्रनिर्मिती, साडी विणकाम, ब्रँडिंग आणि बाजारपेठ अशी संपूर्ण मूल्यसाखळी उभारणे महत्त्वाचे आहे. जालन्यात या दिशेने विविध प्रयोग सुरू आहेत. स्थानिक पातळीवर रेशीम वस्त्रनिर्मितीला चालना मिळाल्यास शेतकरी, महिला, विणकर, व्यापारी आणि युवकांसाठी रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होतील, असे मुख्यमंत्री म्हणाले.

*जालन्यात तयार होणाऱ्या सिल्कच्या उत्पादनांना 'जालनाई' ब्रँडने ओळखले जाईल*

जालन्यातील महिलांनी रेशीमपासून साडी विणकाम सुरू केले असून त्यांचे कौशल्य आणि तयार होणाऱ्या वस्त्रांची गुणवत्ता उल्लेखनीय आहे. या महिलांना अधिक प्रशिक्षण, कौशल्यविकास आणि बाजारपेठ उपलब्ध करून दिल्यास रेशीम वस्त्रनिर्मितीला मोठी चालना मिळू शकते. पैठणीला जशी स्वतंत्र ओळख मिळाली, त्याच धर्तीवर पालकमंत्री पकंजा मुंडे यांनी सुचविल्यानुसार जालन्यात तयार होणाऱ्या सिल्कच्या उत्पादनांना 'जालनाई' या स्वतंत्र ब्रँडने ओळखले जाईल अशी घोषणा करून, 'जालनाई' ब्रॅन्ड लोगोचे विमोचन केले.

ज्याप्रमाणे पैठणी साडी जगप्रसिद्ध आहे, त्याच धर्तीवर स्थानिक महिलांच्या कौशल्याच्या जोरावर 'जालना सिल्क' ला देखील आंतरराष्ट्रीय स्तरावर एक मोठा ब्रँड म्हणून विकसित केले जाईल असे

## विदर्भात शिवसेनेची ताकद आणखी बळकट

दर्यापूर : दर्यापूर नगर परिषदेतील काँग्रेसला मोठा राजकीय धक्का बसल्याची चर्चा असून विदर्भात शिवसेनेची संघटनात्मक ताकद आणखी बळकट झाल्याचे मानले जात आहे. त्याचप्रमाणे शिवसेनेचे जिल्हाप्रमुख डॉ. राज बोरकर, संदीप मेश्राम, सचिन कुंभारे, केतन सहारे, पंकज बोरकर आणि श्रीकांत रामटेके, प्रहारचे बेळगाव जिल्हाध्यक्ष शिवकुमार बोधले, बेळगाव तालुका अध्यक्ष दीपक बोधले, युवा अध्यक्ष बेळगाव जिल्हा रोहित पाटील, मांगुर शाखाप्रमुख सुरेश हेमाजे यांच्यासह अन्य पदाधिकारी सदस्य कार्यकर्त्यांनी ही शिवसेनेमध्ये प्रवेश केला. मुंबईत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे निवासस्थान असलेल्या नंदनवन येथे हा पक्ष प्रवेश झाला. नव्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्वागत केले. दर्यापूरच्या विकासासाठी निधी कमी पडू दिला जाणार नाही. नागरिकांच्या मूलभूत सुविधा आणि विकासकामांना महायुती सरकारची संपूर्ण साथ राहील असं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले. प्रवेश सोहळ्यास विदर्भ आणि कर्नाटकातील विविध संघटनांचे पदाधिकारी, महिला आघाडीच्या कार्यकर्त्या, शाखाप्रमुख आणि शेकडो कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. दरम्यान, १२ ऑगस्ट रोजी दिल्लीत सुप्रीम कोर्टात शिवसेना पक्षाचे नाव आणि चिन्हा बाबत सुनावणी सुरु असताना मुंबईत पक्ष प्रवेश पार पडला. विविध पक्षातील शेकडो कार्यकर्त्यांनी शिवसनेते प्रवेश केला.

## व्ही. एस. एस. फार्मसी महाविद्यालयात राष्ट्रीय ग्रंथपाल दिन उत्साहात साजरा

बदनापूर/प्रतिनिधी : : बदनापूर येथील व्ही. एस. एस. फार्मसी महाविद्यालयात भारतातील ग्रंथालयशास्त्राचे जनक डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय ग्रंथपाल दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमास संस्थेचे सचिव डॉ. शिवाजीराव मदन आणि संस्थेचे संचालक तथा प्राचार्य डॉ. प्रसाद मदन यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून प्रा. डॉ. राहुल एस. अंभोरे, संचालिका डॉ. पूजा मदन, फार्मसी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एच. डी. जेडगे, उपप्राचार्य प्रा. गुलशन राठी, शाळेचे मुख्याध्यापक प्रा. प्रवीण जाधव, प्रा. शुभम मोहिते, ग्रंथपाल प्रा. सोनाली कुलकर्णी तसेच सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



कार्यक्रमाच्या सुरुवातीला सरस्वती मातेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर भारतीय ग्रंथालयशास्त्राचे जनक डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या प्रतिमेचे पूजन करून उपस्थित मान्यवरांचे स्वागत करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक ग्रंथपाल प्रा. सोनाली कुलकर्णी यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. शुभम मोहिते यांनी केले, तर आभार प्रदर्शन उपप्राचार्य प्रा. गुलशन राठी यांनी केले. यावेळी संचालिका डॉ. पूजा मदन यांनी विद्यार्थ्यांच्या जीवनातील वाचनाचे महत्त्व अधोरेखित केले. विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन ग्रंथालयात उपलब्ध असलेल्या विविध पुस्तकांची माहिती होणे, तसेच बदलत्या काळानुसार ग्रंथालयात नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर करणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एच. डी. जेडगे यांनी, पुस्तक हे माणसाचे मन निर्मळ करणारे एक प्रभावी साधन आहे, असे सांगत विद्यार्थ्यांनी नियमित वाचनाची सवय लावून घ्यावी, असे आवाहन केले.

कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी सहाय्यक प्राध्यापक प्रा. डॉ. राहुल एस. अंभोरे (ग्रंथपाल, श्रीमती दानकुंवर महिला महाविद्यालय, जालना) यांनी ग्रंथालय व्यवस्थापन, डिजिटल ग्रंथालये, संशोधन, माहितीशास्त्र तसेच बदलत्या तंत्रज्ञानाच्या पार्श्वभूमीवर ग्रंथपालाची बदलती भूमिका याविषयी मार्गदर्शन केले. तसेच एआय (कृत्रिम बुद्धिमत्ता) चा शैक्षणिक क्षेत्रात प्रभावीपणे कसा वापर करता येईल आणि त्याचा वापर करताना कोणती दक्षता घ्यावी, याबाबतही त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले. उत्साहपूर्ण वातावरणात राष्ट्रीय ग्रंथपाल दिनाचा कार्यक्रम संपन्न झाला.

## शिवसेनेत अनेकांचा प्रवेश

मुंबई : मुंबईत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे निवासस्थान असलेल्या नंदनवन येथे हा पक्ष प्रवेश झाला. नव्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्वागत केले. दर्यापूरच्या विकासासाठी निधी कमी पडू दिला जाणार नाही. नागरिकांच्या मूलभूत सुविधा आणि विकासकामांना महायुती सरकारची संपूर्ण साथ राहील असं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले. प्रवेश सोहळ्यास विदर्भ आणि कर्नाटकातील विविध संघटनांचे पदाधिकारी, महिला आघाडीच्या कार्यकर्त्या, शाखाप्रमुख आणि शेकडो कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. दरम्यान, १२ ऑगस्ट रोजी दिल्लीत सुप्रीम कोर्टात शिवसेना पक्षाचे नाव आणि चिन्हा बाबत सुनावणी सुरु असताना मुंबईत पक्ष प्रवेश पार पडला. विविध पक्षातील शेकडो कार्यकर्त्यांनी शिवसनेते प्रवेश केला.

## हर घर तिरंगा अभियाना अंतर्गत सायकल रॅलीचे आयोजन

जालना : राज्यात दि. ९ ऑगस्ट ते दि. १७ ऑगस्ट २०२६ कालावधीत हर घर तिरंगा' अभियानांतर्गत विविध कार्यक्रमांचे व उपक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. त्याअनुषंगाने उपविभागीय अधिकारी जालना यांनी 'हर घर तिरंगा' अभियानांतर्गत जालना शहरात सायकल रॅलीचे १५ ऑगस्ट, २०२६ रोजी सकाळी ८.०० वाजता आयोजन केले आहे. या सायकल रॅलीचे जिल्हाधिकारी कार्यालय येथून सकाळी ८.४५ वाजता अंबड चौफुली–नुतन वसाहत–रेल्वे स्टेशन–चमन–शनि मंदिर–छत्रपती संभाजी महाराज पुतळा – मोतीबाग – जिल्हाधिकारी कार्यालयामार्गे आयोजित करण्यात आली आहे. या सायकल रॅलीत जास्तीत जास्त नागरिक व विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे असे आवाहन उपविभागीय अधिकारी रामदास दौंड यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

## स्वातंत्र्यदिनी आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकरांचा गावागावातील आरोग्य समित्यांच्या सदस्यांशी थेट ऑनलाइन जनसंवाद

मुंबई :– गावपातळीवरील आरोग्य व्यवस्था अधिक सक्षम, लोकाभिमुख आणि प्रभावी करण्यासाठी सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर स्वातंत्र्य दिनानिमित्त राज्यभरातील विविध आरोग्य समित्यांच्या अशासकीय सदस्यांशी थेट ऑनलाइन जनसंवाद साधणार आहेत. या माध्यमातून आरोग्य व्यवस्थेमध्ये लोकसहभाग वाढविण्यावर भर राहणार असून राज्यातील १२४ आरोग्य संस्थांचे ऑनलाईन उद्घाटनही आरोग्यमंत्री करणार आहेत.

१५ ऑगस्ट रोजी दुपारी १.३० वाजता होणाऱ्या या जनसंवादातून गावागावातील आरोग्यविषयक प्रश्न, सूचना आणि अपेक्षा थेट आरोग्यमंत्री यांच्यापर्यंत पोहोचणार असून त्याचवेळी राज्यातील विविध नवीन आरोग्य संस्थांचे ऑनलाइन उद्घाटनही करण्यात येणार आहे. निरोगी महाराष्ट्रासाठी शासन, आरोग्य यंत्रणा आणि समाज यांची भागीदारी अधिक मजबूत करण्यासाठी होणारा जनसंवाद आरोग्य क्षेत्रातील लोकसहभागाला नवी दिशा देणारा ठरणार आहे.



आरोग्य सेवांची गुणवत्ता, विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी, नागरिकांचा आरोग्य व्यवस्थेतील सहभाग आणि स्थानिक पातळीवरील आरोग्यविषयक अडचणी याबाबत या जनसंवादातून थेट चर्चा होणार आहे. निवडक पाच समिती सदस्यांना आपले मनोगत मांडण्याची संधी मिळणार असून, त्यानंतर आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर मार्गदर्शन करणार आहेत.

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या माध्यमातून कार्यरत असलेल्या ग्राम आरोग्य, स्वच्छता व पोषण समिती, जन आरोग्य समिती, रुग्ण कल्याण समिती आणि एकात्मिक आरोग्यवर्धिनी समिती या समित्या शासन आणि नागरिक यांच्यातील महत्त्वाचा दुवा आहेत. या समित्यांमध्ये आरोग्य यंत्रणांसोबत ग्रामपंचायत प्रतिनिधी, महिला प्रतिनिधी, युवक, स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी, लोकप्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्ते तसेच विविध घटकांचा सहभाग असतो. गावपातळीपासून जिल्हास्तरापर्यंत व्यापक सहभाग या कार्यक्रमासाठी जिल्हास्तरावर व्यापक पूर्वतयारी करण्यात आली आहे. प्राथमिक आरोग्य केंद्रस्तरावर स्वच्छता व पोषण समिती आणि जन आरोग्य समितीतील अशासकीय सदस्यांना एकत्रित उपस्थित राहण्याचे नियोजन करण्यात आले आहे. ग्रामीण व उपजिल्हा रुग्णालयांच्या कार्यक्षेत्रातील लोकप्रतिनिधी, जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्य तसेच संबंधित मान्यवरांनाही सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे. गावपातळीवर स्वच्छता व पोषण समिती सदस्य, समुदाय आरोग्य अधिकारी, आशा स्वयंसेविका आणि अंगणवाडी सेविका यांनी नजीकच्या अंगणवाडी केंद्रात किंवा ग्रामपंचायत कार्यालयात एकत्रित उपस्थित राहून ऑनलाइन कार्यक्रमात सहभागी (पान ३ वर)

## महाराष्ट्राच्या राजकारणात खळबळ

मुंबई : शिवसेना पक्ष प्रवेश : शिवसेना पक्ष कुणाचा? शिवसेना पक्षाचे नाव आणि चिन्हाचा वाद सुप्रीम कोर्टात पोहचला आहे. सुप्रीम कोर्टात शिवसेना पक्षाचे नाव आणि चिन्हा बाबत सुनावणी सुरु आहे. असे असताना एकनाथ शिंदेनी काँग्रेसचे १९ नगरसेवक फोडले आहे. अमरावतीमधील काँग्रेसच्या १९ नगरसेवकांनी एकनाश शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश केला आहे. यामुळे विदर्भात काँग्रेसला मोठे खिंडार पडले आहे. विदर्भात काँग्रेसला मोठा धक्का बसला आहे. एका झटक्यात सर्व राजकीय समीकरण बदलणार आहेत. अमरावती जिल्ह्यातील दर्यापूर नगर परिषदेच्या काँग्रेसच्या नगराध्यक्षा मंदाकिनी भारसाकळे, नगर परिषदेचे १९ नगरसेवक, तसेच अकोल्यातील ज्येष्ठ नेते रामदास बोडके यांचे पुत्र दीपक बोडके आणि त्यांच्या सहकाऱ्यांसह प्रहार संघटना, शौर्य सेना, आजाद समाज पक्ष तसेच कर्नाटकातील बेळगाव येथील अनेक पदाधिकाऱ्यांनी शिंदेंच्या शिवसेनेत प्रवेश केला आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत शिवसेनेत हा जाहीर पक्ष प्रवेश झाला. या प्रवेशामुळे दर्यापूर नगर परिषदेतील काँग्रेसला मोठा राजकीय धक्का बसल्याची चर्चा असून विदर्भात शिवसेनेची संघटनात्मक ताकद आणखी बळकट झाल्याचे मानले जात आहे. त्याचप्रमाणे शिवसेनेचे जिल्हाप्रमुख डॉ. राज बोरकर, संदीप मेश्राम, सचिन कुंभारे, केतन सहारे, पंकज बोरकर आणि श्रीकांत रामटेके, प्रहारचे बेळगाव जिल्हाध्यक्ष शिवकुमार बोधले, बेळगाव तालुका अध्यक्ष दीपक बोधले, युवा अध्यक्ष बेळगाव जिल्हा रोहित पाटील, मांगुर शाखाप्रमुख सुरेश हेमाजे यांच्यासह अन्य पदाधिकारी सदस्य कार्यकर्त्यांनी ही शिवसेनेमध्ये प्रवेश केला.

***सुट्टीची सुचना***

आज रविवार दि. १५ ऑगस्ट २०२६ रोजी भारतीय स्वतंत्र्य दिनानिमित्त दैनिक चकमक कार्यालयास सुट्टी असल्याने उद्या सोमवार दि.१६ ऑगस्ट २०२६ रोजी अंक प्रकाशित होणार नाही याची सर्व जाहिरातदार, वाचक, हितचिंतक यांनी नोंद घ्यावी.

**व्यवस्थापक दैनिक चकमक**

## सचखंड, नरसापूर एक्सप्रेसला थांबा देण्यासह नव्या रेल्वे सुरू करण्याची मागणी; रेल्वे मंत्रालयाकडे पाठपुरावा करण्याचे डॉ. अजित गोपछडे यांचे आश्वासन

### परतूर रेल्वे स्थानकाच्या विविध मागण्यांसाठी भाजपकडून निवेदन

परतूर । प्रतिनिधी : भाजपा जालना जिल्हा नवीन कार्यालयाच्या भूमिपूजन सोहळ्याच्या निमित्ताने परतूर रेल्वे स्थानकासह मराठवाड्यातील रेल्वे प्रवाशांच्या विविध प्रलंबित मागण्यांसंदर्भात राज्यसभा खासदार तथा जालना जिल्हा भाजपा महानगर प्रभारी डॉ. अजित गोपछडे यांना निवेदन सादर करण्यात आले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत हा भूमिपूजन सोहळा पार पडला. निवेदनामध्ये परतूर रेल्वे स्थानकावर सचखंड एक्सप्रेस आणि नरसापूर सुपरफास्ट एक्सप्रेसला थांबा देण्यात यावा, तसेच छत्रपती संभाजीनगर–नागपूर, छत्रपती संभाजीनगर–बेंगळुरू आणि छत्रपती संभाजीनगर–जोधपूर या रेल्वेगाड्या सुरू करण्यात याव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच अजनी–कुर्ला एक्सप्रेस हिंगोली मार्गे पूर्ववत करण्यात यावी, अशीही मागणी निवेदनातून करण्यात आली. परतूर व परिसरातील प्रवाशांना सध्या रेल्वेच्या मर्यादित सुविधांमुळे अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. महत्त्वाच्या एक्सप्रेस गाड्यांना परतूर येथे थांबा मिळाल्यास विद्यार्थी, व्यापारी, नोकरदार, शेतकरी तसेच सर्वसामान्य प्रवाशांना मोठा फायदा होणार आहे. त्यामुळे या मागण्यांकडे तातडीने लक्ष देण्याची मागणी करण्यात आली.



निवेदनाची दखल घेत डॉ. अजित गोपछडे यांनी तत्काळ केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्या रेल्वे मंत्रालयाकडे निवेदन पाठवून योग्य ती कार्यवाही करण्याची मागणी केली. त्यामुळे परतूरसह मराठवाड्यातील रेल्वे सुविधांच्या प्रश्नांना आता अधिक गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. यावेळी राज्यसभा खासदार तथा जालना जिल्हा भाजपा ग्रामीण प्रभारी रामराव वडकुते, डॉ. स्वप्नील बी. मंत्री, मुख्य प्रदेश प्रवक्ते तथा मुख्य प्रदेश समन्वयक भाजपा चिकित्सा प्रकोष्ठ महाराष्ट्र प्रदेश, भाजपा किसान मोर्चा महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस राजेश मोरे, भाजपा वैद्यकीय आघाडी महाराष्ट्र प्रदेश होमिओपॅथी विंग प्रदेश सहसंयोजक डॉ. संदीप चोपडे, भाजपा वैद्यकीय आघाडी प्रदेश समन्वयक डॉ. गोविंद भताने, भाजपा वैद्यकीय आघाडी महाराष्ट्र प्रदेश होमिओपॅथी विंग प्रदेश सहसंयोजक डॉ. राम पाटील यांच्यासह भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. परतूरच्या रेल्वे विकासासाठी सातत्यपूर्ण पाठपुरावा सुरू ठेवणार असून, प्रवाशांच्या मूलभूत सुविधांसाठी आणि जनतेच्या प्रलंबित मागण्यांसाठी सातत्याने प्रयत्न केले जातील, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.